महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २८७ वे | दिनांक : १३/१०/२०२६ | वार : मंगळवार


## राहुल गांधींसह विरोधकांचा मोर्चा; सर्वोच्च न्यायालयावर दबाव आणण्याचा प्रयत्न, फडणवीसांचा आरोप



**मुंबई :** देशभरात अनेक ठिकाणी आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले आहे. राजधानी दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात कॉकरोच जनता पार्टीचे कार्यकर्ते तसेच युवक आंदोलन करत आहेत. तर दुसरीकडे कॉंग्रेस पक्ष व इंडिया आघाडीने देखील आंदोलनाला सुरुवात केली आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात सर्वोच्च न्यायालयावर इंडिया आघाडीने मोर्चा काढला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, कॉंग्रेस पक्षाने जे चालवलेले आहे ते पूर्णपणे संविधान विरोधी आहे. संविधान हातात घेऊन संवैधानिक संस्थांना बदनाम करणे सुरू आहे. या ठिकाणी सुप्रीम कोर्ट, सीएजी, आरबीआय या सगळ्या संस्था कुचकामी आहेत असं दाखवायचं, लोकांना संवैधानिक संस्थांना न्याय देऊ शकत नाही असं सांगायचं आणि शेवटी सांगायचं की संविधान बदलावं लागेल. त्यांना अती डावी विचारसरणी लादायची आहे. संविधानाला नाकारण्याचं काम राहुल गांधी आणि विरोधकांनी केले आहे. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्यावेळी तुम्ही म्हणता आम्ही सर्वोच्च न्यायालयावर आम्ही मोर्चा काढू आणि मुख्य न्यायाधीशांनी आमचे निवेदन घेतले पाहिजे आणि आमच्याशी चर्चा केली पाहिजे. हे कोणत्या संविधानात लिहिलं आहे? सर्वोच्च न्यायालय हे सेपरेशन ऑफ पॉवर प्रमाणे वेगळे आहे. सर्वोच्च न्यायालयाला कोणाचेही निवेदन घेता येत नाही. कुठलेही निवेदन घेता येत नाही. त्यांचा अधिकार तुम्ही केस टाका त्यावर सुनावणी करण्याचा आहे. मी तर सांगतो हे जाणीवपूर्वक सर्वोच्च न्यायालयावर दबाव आणण्याचे काम सुरू आहे. माझा सवाल आहे, तुम्ही सांगा सर्वोच्च न्यायालयाने आणि मुख्य न्यायाधीशयाने आंदोलनाला सामोरे जाणं हे भारतीय संविधानात अपेक्षित आहे का? हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान लिहिलं आहे, त्याला अपेक्षित आहे का? भारतीय संविधानानुसार सर्वोच्च न्यायालयाचा अशा पद्धतीने अवमान करता येतो का? असा प्रश्न फडणवीस यांनी उपस्थित केला आहे.

## ‘विवेक भीमनवार यांचा राजीनामा झालाच नाही’:‘पेपरफुटी झाली तर नुकसानाला जबाबदार कोण?’- सुषमा अंधारे



**पुणे :** एमपीएससी पेपरफुटी प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. गेल्या 11 दिवसांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात पुण्यातील विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होते. या आंदोलनाला यश आले असून सरकारने विद्यार्थ्यांच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या आहेत. तसेच पेपरफुटी प्रकरणी चौकशी पूर्ण होईपर्यंत आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार हे त्या पदावर असणार नाहीत. यावर आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.सुषमा अंधारे म्हणाल्या, महत्त्वाच्या मंगण्यांवर बोलणे झाले नाही. पेपरफुटी झाली तर कोणावर तरी कारवाई झाली पाहिजे. आयोगाने अनेक घोळ घातले आहेत. ते कोण स्वीकारणार? जे नुकसान होत आहे त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच राजीनामा झालाच नाही. विवेक भीमनवार यांना सक्तीच्या रजेवर पाठवले असते तर त्याचे ट्विट फडणवीसांनी केले असते. पण ते ट्विट विवेक भीमनवार यांनी का केले? असा सवाल अंधारे यांनी केला आहे.पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणालाय, विवेक भीमनवार स्वतः हवा पालटीसाठी बाजूला गेले आहेत. विद्यार्थ्यांच्या हाती नेमके काय लागले? गुन्हे मागे घेतले आहेत हे खरे असेल तर विद्यार्थी जिथे राहतात तिथल्या घर मालकांना नोटीस का पाठवल्या? शिवेंद्रराजे आणि रोहित पवारांची भेट कधी झाली? त्यांची चर्चा काय झाली? हे माहिती नाही, असे अंधारे यांनी म्हटले आहे.विक्रम पाचपुते या एका जबाबदार व्यक्तीने विद्यार्थ्यांना अर्बन नक्षल म्हटले होते ते शब्द देखील परत घेतले नाहीत. मग हे आंदोलन यशस्वी कसे झाले. हे आंदोलन यशस्वी झाले नाही, अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली आहे. जी पोरं आंदोलनातून समोर आली, उद्या ती पोरं पास झाली तर सरकार उद्या या पोरांना सेवेत सामावून घेईल का? या पोरांना उद्या सूड बुद्धीने वागवलं जाणार नाही हे कशावरुन. पदवीधर निवडणुकीला आंदोलनाला फटका बसू नये म्हणून सरकारने तात्पुरती सारवासारव केली आहे. सरकारने विद्यार्थ्यांची फक्त दिशाभूल केली नाही तर सरकारने विद्यार्थ्यांसोबत क्रूर चेष्टा केली आहे. ही पोरं सरकारला विरोध करत होती, ती पोरं सरकारच्या गोपनीय अहवालात कायमची लिहिली जातील. ही दिशाभूल आहे. रोहित पवारांनी मोठ योगदान दिलं आहे. त्यांच्या वतीने वेळ देणं महत्त्वाची गोष्ट आहे. पण या आंदोलनातून हातात काही पडलं नाही हे तेवढेच खरं असल्याचे सुषमा अंधारे म्हणाल्या. दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यावरूनही वातावरण चांगलेच तापले आहे. त्यांच्यावर आक्षेप आहेत.

## दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नका



**मुंबई :** राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित भागातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या परीक्षा शुल्क माफीबाबत उच्च शिक्षण संचालनालयाने परिपत्रक जारी केले आहे. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी त्यांच्याकडून परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक तथा तंत्रशिक्षण विभागाचे संचालकडॉ प्रमोद नाईक, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव अमोल मुत्याल ,उपसचिव प्रताप लुबाळ, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र कुलगुरू, अधिकारी (ऑनलाईन) व संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नये, अशी भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिला. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांवर परीक्षा शुल्काचा अतिरिक्त आर्थिक भार पडू नये, यासाठी शासनाच्या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करावी. शासनाच्या निर्देशांचे पालन करून विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही, याची दक्षता विद्यापीठ प्रशासनाने घ्यावी. तसेच, शासनाच्या सूचनांचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांची दखल घेऊन त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना दिलासा देणे ही शासनाची प्राथमिकता आहे असेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६


## शिक्षण परिषदेत मूल्यवर्धन कार्यशाळेच्या उजळणी वर्गाचे आयोजन



**कन्नड (अरुण थोरात) :** जिल्हा परिषद प्रशाला कन्नड येथे दि. 12 आक्टोंबर रोजी कन्नड केंद्राची विशेष शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली होती. या शिक्षण परिषदेमध्ये मूल्यवर्धन कार्यशाळेच्या उजळणी वर्गाचे प्रशिक्षण दोन टप्प्यांत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.या प्रशिक्षणासाठी सकाळ सत्रात शिक्षण विभागातील गटशिक्षण अधिकारी मनीष दिवेकर, केंद्रप्रमुख बाजीराव ताठे, जि प प्रशालेचे मुख्याध्यापक दिलीप गायकवाड, केंद्रमुख्याध्यापक सतीश कोळी तसेच मूल्यवर्धन प्रशिक्षणाच्या समन्वयक श्रीमती जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षणादरम्यान सकाळ व दुपारच्या सत्रात सुलभक उके व रावसाहेब अहिरे यांनी मूल्यवर्धन उपक्रमाची उद्दिष्टे, विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक, व्यक्तिमत्त्व विकास आणि दैनंदिन अध्यापनात मूल्यशिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. या उजळणी वर्गाच्या माध्यमातून शिक्षकांना मूल्यवर्धन उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व दिशा मिळाली. विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार, सकारात्मक दृष्टिकोन आणि जीवनोपयोगी मूल्ये विकसित करण्यासाठी अशा प्रशिक्षणांचे महत्त्व अधोरेखित झाले. मूल्यशिक्षणातून सुसंस्कारित विद्यार्थी आणि सुसंस्कारित समाज घडविण्याच्या दिशेने हा प्रशिक्षण वर्ग निश्चितच महत्त्वपूर्ण ठरला.

## समाजसेविका सौ बेबीता ताई यांची निरगुडी बु. ठाकरवाडी येथे सदिच्छा भेट; सामाजिक प्रश्नांवर चर्चा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यात असलेल्या निरगुडी बु. ठाकरवाडी येथे समाजसेविका बेबीता ताई (भावली ता इगतपुरी) यांनी आदिवासी ठाकर समाजबांधवांची सदिच्छा भेट घेतली.या भेटीदरम्यान समाजातील विविध समस्या, सामाजिक प्रश्न आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासंदर्भात चर्चा करण्यात आली.या भेटीच्या माध्यमातून बेबीता ताई यांनी ठाकर समाजबांधवांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी आणि प्रश्न जाणून घेतले.आदिवासी समाजाच्या विकासासाठी जल जंगल जमीन व शिक्षण, आरोग्य, रोजगार,वन पट्टे धारक, वन जमिनी मूलभूत सुविधा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.ग्रामीण आणि दुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या आदिवासी ठाकर समाजाच्या विकासासाठी सामाजिक एकता, जनजागृती आणि संघटित प्रयत्नांची गरज आहे. समाजातील समस्या सोडविण्यासाठी समाजबांधवांनी एकत्र येऊन संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि समाजाच्या प्रगतीसाठी सकारात्मक दृष्टिकोनातून प्रयत्न करणे, हे या भेटीचे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरले.यावेळी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक एकता, शिक्षणाचे महत्त्व, युवकांचा सहभाग आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांसारख्या विषयांवर चर्चा करण्यात आली. समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन आपल्या समस्या मांडाव्यात तसेच समाजाच्या उन्नतीसाठी संघटितपणे प्रयत्न करावेत, यावरही भर देण्यात आला.समाजसेविका बेबीता ताई यांच्या या सदिच्छा भेटीमुळे समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अशा भेटींमुळे समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्यास, परस्पर संवाद वाढविण्यास आणि सामाजिक सलोखा मजबूत करण्यास मदत होते.यादरम्यान रंगनाथ मेंगाळ, सनिराम गावंडे, बबन कातवारे सोमनाथ मेंगाळ, बाळू मधे, सोमिनाथ मेंगाळ, लक्ष्मण मेंगाळ, पांडुरंग मधे,जनाबाई मधे,पुनम मेंगाळ,तुकाराम मेंगाळ, तुकाराम बांगारे, रामचंद्र मधे,बुधा मधे,सखुबाई मधे ,वंदना मेंगाळ,वाळूचा मेंगाळ,व ठाकर समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते आदिवासी ठाकर समाजाच्या विकासासाठी समाजातील प्रत्येक घटकाने एकजुटीने पुढाकार घेणे गरजेचे असून, अशा संवादातून समाजाच्या प्रगतीला नवी दिशा मिळू शकते.

## सहाशे किलोमीटरचे अंतर पायी पार करत मशाल ज्योतीचे जल्लोषात स्वागत



**कन्नड (अरुण थोरात) :** कोल्हापूर ते कन्नड (मक्रणपुर) 600 किलोमीटरचे अंतर पायी पार करून आलेल्या 'मशाल ज्योत सोहळ्याचे' कन्नड येथील मक्रणपुर येथे अभूतपूर्व उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या या पायी प्रवासाची सांगता अत्यंत भारावलेल्या वातावरणात झाली.हिंदू एकता मित्र मंडळ च्या वतीने या भव्य ज्योत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापूर येथून या पवित्र ज्योतीचे प्रस्थान झाले होते. कडक ऊन, पाऊस आणि वाटेतील सर्व अडथळ्यांवर मात करत, तब्बल सहाशे किलोमीटरचा टप्पा केवळ पायांनी चालत पूर्ण करणाऱ्या या तरुण आणि वृद्ध भाविकांच्या चिकाटीचे सर्वत्र कौतुक होत आहे. ज्योत शहराच्या वेशीवर पोहोचताच हजारो नागरिकांनी 'ज्ञानोबा-तुकाराम' आणि अंबाबाईचा उदो उदो च्या जयघोषात संपूर्ण परिसर दणाणून सोडला. फुलांची उधळण करण्यात आली होती आणि महिलांनी आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. पारंपरिक वाद्यः ढोल-ताशांचा गजर, लेझीम पथके आणि पारंपरिक अश्वांच्या नाचण्याने मिरवणुकीची शोभा अधिकच वाढवली. या सोहळ्यात सहभागी झालेल्या एका तरुण धारकाने सांगितले, " सहाशे किलोमीटर पायी चालणे सोपे नव्हते. पायाला फोड आले, थकवा जाणवला, पण हातातील पवित्र ज्योत आणि मनातील भक्तीची ऊर्जा आम्हांला प्रत्येक पाऊल पुढे टाकण्याची ताकद देत होती." मार्गात अनेक ठिकाणी स्थानिक ग्रामस्थांनी या ज्योत धारकांसाठी राहण्याची आणि जेवणाची उत्तम सोय केली होती.संध्याकाळी मुख्य मंदिरात महाआरती करून या ऐतिहासिक ज्योत सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी परिसरातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि गावातील हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



**दौलताबाद (जावेद अहमद) :** गंगापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, आसेगाव येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केलीया स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.या स्पर्धेत भक्ती नवले हिने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक, तर प्रगती लोखंडे हिने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच शिवानी उबाळे हिने तिहेरी उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले. या यशामुळे तिन्ही विद्यार्थिनींनी जिल्हास्तरीय स्पर्धेत खेळण्याचा मान मिळवला आहे.विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल शाळेच्या संचालिकागीता फाळके , सचिव रत्नाकर फाळके , प्राचार्य योगेश फाळके आणि मुख्याध्यापिका रोशनी कांबळे ,व सर्व शिक्षक यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६

## स्वत:साठी थोडं जगावं

कलियुगातल्या बापाला,
जगतांना होते खूप त्रास,
म्हातारपणात सुखाची,
कोणाकडून नसते आस. १

चालता बोलता बापाला
घरात त्रास सारेच देतात.
बाप थकून बसल्यावर,
खरंच काळजी घेतात ? २

राबतांना बाप सर्वांना,
हवा हवासाच असतो.
थकून गेलेल्या बापाची,
कोणालाच पर्वा नसतो. ३

शिकून पोरग बापाला,
वृद्धाश्रमात का सोडतो.
स्वप्न बापाचे भर दिवसा,
असा अचानक मोडतो. ४

राबणाऱ्या बापाचे मन,
जगतांना तीळतीळ तुटते.
मुलांचे वागणे पाहताच,
मनावरचे संयम सुटते. ५

राब राब राबतांना बाप,
सदा कुटुंबासाठी पळतो.
थकलेल्या बापाचे दु:ख,
सांगा हो कुणाला कळतो. ६

म्हणून म्हणतो मित्रांनो,
स्वत:साठी थोडं जगावं.
आपणच आपल्या मनाला,
जगतांना आनंदात बघावं. ७

कोणी नाही कोणाचाच,
स्वार्थाशिवाय या जगात.
बापाने ही समजून घ्यावे,
लबाड लंपट कलियुगात. ८



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# चिकलठाणा मनपा शाळेत विद्यार्थ्यांसाठी मोफत स्मार्ट सिटी बस सेवेचा शुभारंभ थाटात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** "निष्काम जन सेवाये समर्पिता" हे ब्रीदवाक्य असणाऱ्या मनपा छत्रपती संभाजीनगरच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत मनपा छत्रपती संभाजीनगर शिक्षण विभागातर्फे शाळेपासून दूर राहणाऱ्या अनियमित शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत स्मार्ट सिटी बस सेवा सुरू केली आहे. त्याचा उद्धाटन सोहळा दिनांक 12/ 10/ 2026 रोजी शाळेचे मुख्याध्यापक श्री. वसंत राठोड तसेच शिक्षक वृंद, विद्यार्थी, पालक यांच्या उपस्थितीत अतिशय आनंदाने पार पडला. यावेळी बसचे सुशोभीकरण करण्यात आले होते. शाळेचे श्री .वसंत राठोड सर यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करून या मोफत बस सेवेचा श्री गणेशा करण्यात आला. तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री. कैलास रिठे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचे आणि आनंदाचे भाव दिसत होते. राणा टॉवर, हिरापूर परिसर येथे पालकांनी या बसचे जल्लोषात स्वागत केले आणि शुभेच्छा दिल्या. राणा टॉवर, गुरुपुष्प सोसायटी, साई मंदिर, कॅंब्रिज चौक, बजरंग नगर, हिना नगर ,जुना जकात नाका ,मोतीवाला कॉलनी, सावित्री नगर या परिसरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना या मोफत बस सेवेचा लाभ होणार आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेऊन या बस सेवेचा लाभ घ्यावा. असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक श्री. वसंत राठोड सरांनी केले आहे. ही बस सेवा सुरू करण्यासाठी चिकलठाणा प्रभागाचे विद्यमान नगरसेवक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. वसंत राठोड सर यांनी विशेष परिश्रम घेतले. या सर्वांचे शाळेच्या विद्यार्थ्यांनी विशेष आभार मानले .

# ग्रामपंचायतीची ठरावासह महावितरण कडे विविध समस्या बाबत तक्रार



**उमरगा/लोहारा : (प्रा.नागसेन कांबळे)**तालुक्यातील कलदेव लिंबाळा येथील स्मार्ट मीटर व विविध समस्या बाबत ग्रामस्थांचे तक्रार निवारण करण्याबाबत अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.वीज ग्राहकांचे मीटर पूर्वसूचनेशिवाय काढणे, स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांच्या संमतीचा प्रश्न तसेच गावातील विद्युत पोल व वायर दुरवस्था या मुद्द्यांवर कलदेव निंबाळा ग्रामपंचायतीने महावितरण प्रशासनाला ठाम निवेदन दिले आहे. ग्रामपंचायतीच्या ठरावासह ग्रामपंचायत गटनेत्या तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हा उपाध्यक्षा सुनीता पावशेरे यांनी महावितरणचे अभियंता एस. एस. बेतुलवाड यांच्याकडे हे निवेदन सादर केले.गावातील बर्याच वीज ग्राहकांचे थकबाकी वसुलीच्या कारणास्तव पूर्वसूचना न देता मीटर काढले जात असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच ग्राहकांना योग्य माहिती न देता स्मार्ट मीटर बसविले जात असल्याबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर मीटर काढताना नियमानुसार पूर्वसूचना व आवश्यक प्रक्रिया पाळावी, स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या संमतीचा विचार करावा, संबंधित प्रकरणांची चौकशी करावी, नियमबाह्य पद्धतीने बसविलेल्या मीटरबाबत योग्य ती कार्यवाही करावी आणि त्याचा लेखी अहवाल ग्रामपंचायतीला द्यावा, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.याशिवाय गावातील विद्युत पोलवरील वायर व्यवस्थित बसवाव्यात, वाकलेले पोल सरळ करावेत आणि संभाव्य धोके टाळण्यासाठी आवश्यक दुरुस्ती तातडीने करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.अधिकाऱ्यांचे आश्वासन..निवेदनाची दखल घेत कार्यकारी अभियंता एस. एस. बेतुरवाड यांनी यापुढे वीज मीटर काढताना पूर्वसूचनेबाबत आवश्यक काळजी घेतली जाईल, तसेच ग्राहकांच्या संमतीशिवाय नवीन स्मार्ट मीटर बसविले जाणार नाहीत, असे आश्वासन दिल्याचे सुनीता पावशेरे यांनी सांगितले. मागण्यांवर प्रत्यक्ष कार्यवाही न झाल्यास वरिष्ठ कार्यालयांकडे तक्रार करून पाठपुरावा करण्याचा इशाराही ग्रामपंचायतीने दिला आहे.या निवेदनाच्या प्रती उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार,

तहसीलदार,महावितरणचे संबंधित विभागीय अधिकारी, तसेच ग्राहक तक्रार निवारण मंच, धाराशिव यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. या निवेदनावर सरपंच महादेव कांबळे व ग्रामपंचायत सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी किशोर पाटील उपस्थित होते.वीज ग्राहकांना न्याय मिळावा, अनावश्यक त्रास थांबावा आणि गावातील विद्युत व्यवस्थेतील त्रुटी दूर व्हाव्यात, यासाठी ग्रामपंचायतीने घेतलेल्या या भूमिकेनंतर महावितरण प्रशासनाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६


## सुनील राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त २३५ विद्यार्थ्यांना पाण्याच्या बाटल्या व खाऊचे वाटप



*फोटो ओळ : केसरजवळगा, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेत सुनील राठोड यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मुरूम रोटरी क्लब शेतीच्या वतीने विद्यार्थ्यांना पाणी बॉटल वाटप करताना मान्यवर व अन्य.*

**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** केसरजवळगा, ता. उमरगा येथील श्रीपीएम केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सुनील नरसिंग राठोड यांच्या ४२ व्या वाढदिवसानिमित्त आणि रोटरी क्लब मुरूम सिटीच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी हिताच्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व २३५ विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या व खाऊचे वाटप करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना दैनंदिन वापरातील उपयुक्त वस्तू उपलब्ध करून देणे आणि त्यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. वाढदिवस केवळ वैयक्तिक स्तरावर साजरा न करता सामाजिक दायित्व म्हणून विद्यार्थ्यांच्या हितासाठी साजरा केल्याबद्दल उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.या प्रसंगी सत्कारमूर्ती सुनील राठोड यांचा रोटरी क्लब आणि जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.कार्यक्रमादरम्यान डॉ. महेश मोटे, बिरबलसिंग राजपूत, माजी सरपंच अमोल पटवारी आणि जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना उपयुक्त वस्तूंचे वाटप केल्याने सामाजिक बांधिलकी दृढ होते आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. तसेच शिक्षणासोबतच आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अजित शेख, रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष कल्लय्या स्वामी, सचिव प्रकाश रोडगे, मल्लिकार्जुन बदोले, प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. महेश जिरोळे, डॉ. महेश स्वामी, माजी सचिव कल्लप्पा पाटील, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, शिवकुमार स्वामी, शिवशंकर पाटील, बाबासाहेब पाटील, मुख्याध्यापक बालाजी भोसले, उपसरपंच जयपाल राजपूत, चव्हाण सर, संजय कांबळे, चिंचोळे सर, बदोले सर, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या लक्ष्मीबाई राजपूत, रमा सुरवसे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहशिक्षक विनोद सूर्यवंशी, बालाजी चव्हाण, प्रमोद सागरे, संजीव भोसले, सहदेव बोडरे, सुनीता चव्हाण, पूजा जाधव आणि निकिता रायभोगे यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश सूर्यवंशी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार बालाजी भोसले यांनी मानले.

## सौ.सुनीता संजय मोरे लिखित "भावनांची गुंफण" कवितासंग्रह व "अनोखी विण" कथासंग्रह या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

**लातूर :** मराठवाडा साहित्य परिषद, शाखा लातूर द्वारा दि. १३.१०.२०२६ मंगळवार रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जयक्रांती महाविद्यालय लातूर येथे पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कवयित्री व कथाकार सौ. सुनीता संजय मोरे लिखित 'भावनांची गुंफण' या काव्यसंग्रहाचे व 'अनोखी वीण' या कथासंग्रहाचे प्रकाशन होणार आहे. ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार सर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. तर म.सा.प.छ. संभाजीनगरचे सदस्य प्रो.डॉ.जयद्रथ जाधव, ज्येष्ठ कवी व गझलकार मा. योगीराज माने हे पुस्तकांवर भाष्य करणार आहेत.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्या प्राचार्य डॉ. कुसुमताई मोरे, प्रा. गोविंद घार (सचिव भारत शिक्षण प्रसारक मंडळ लातूर), प्रमुख उपस्थिती कवयित्री शैलजा कारंडे (उपाध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूर.)वरील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे. तरी या कार्यक्रमास साहित्यप्रेमी नागरिक, शिक्षक- प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा लातूरच्या वतीने करण्यात येत आहे

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा मोहम्मदसैफ केंद्रीय युवा महोत्सवात स्पॉट फोटोग्राफीमध्ये तृतीय



**उमरगा :** केंद्रीय युवा महोत्सवात महाविद्यालयाच्या इनामदार मोहम्मदसैफ हजरत याने स्पॉट फोटोग्राफी स्पर्धेत, तर सूरज शंकर सुरवसे याने रांगोळी स्पर्धेत सहभाग घेतला. मोहम्मदसैफ याने आपल्या छायाचित्रण कौशल्याच्या बळावर या स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने दिनांक ५ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या केंद्रीय युवा महोत्सवात श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या महोत्सवात महाविद्यालयातील सुरज शंकर सुरवसे याने रांगोळी स्पर्धेत, तर इनामदार मोहम्मदसैफ हजरत याने स्पॉट फोटोग्राफी स्पर्धेत सहभाग घेतला होता. या महोत्सवात महाविद्यालयाच्या इनामदार मोहम्मदसैफ हजरत याने स्पॉट फोटोग्राफी स्पर्धेत तृतीय पारितोषिक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. इनामदार याने आपल्या छायाचित्रण कौशल्याच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री. अश्लेष भैय्या मोरे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एन.अस्वले, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ.व्ही.डी. देवरकर, कला व सांस्कृतिक विभागाचे समन्वयक डॉ. एस.एन.मुच्छटे, डॉ.सी. डी. करे, डॉ. एस. टी. तोडकर, डॉ. एम. एस. निर्मळे आणि प्रा. श्रीमती आर. आर. नितनवरे हे उपस्थित होते.

## माय महोत्सवच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ.सदाशिव सुर्यवंशी यांची निवड



**कन्नड (अरुण थोरात) :** साहित्य, कला आणी आदिवासी संस्कृतीच्या संवर्धनासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या माय महोत्सव-2026 च्या अध्यक्षपदी धुळे येथील प्रसिध्द कवी, गझलकार, सूत्रसंचालक, व व्याख्याते प्रा.डॉ.सदाशिव सुर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे. प्रा.डॉ.सदाशिव सुर्यवंशी हे धुळे येथील एस.एस.व्ही.पी.एस. कला आणी वाणिज्य महाविद्यालय येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.त्यांचे वसुंधरा,माणूस जाळण्याच्या अटोवर, घरवावर (अहिराणी काव्यसंग्रह)व अहिरानीन्या पाहुलखुणा हा लेख संग्रह प्रकाशित आहे. महाराष्ट्र शाहिर या चित्रपटासाठी भाषा मार्गदर्शक म्हणून खान्देशी संवाद लेखन केले आहे. तसेच त्यांना अहिराणी भाषेतील योगदानाबद्दल प्रा.डॉ.द.गो.बोरसे पुरस्कार मिळाला आहे. ते खान्देश साहित्य संघाचे अध्यक्ष आहेत.खान्देश साहित्य संघाच्या माध्यमातून अहिराणी बोली भाषेचे संवर्धन व जतन करण्यासाठी अहिराणी साहित्य संमेलन, आखाजी महोत्सव, नवोदीत साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याचे काम केले जात आहे. माय महोत्सव रविवार दि. 15 नोव्हेंबर 2026 रोजी सायं 5 वा. झिरणीपाडा ता.साक्री जि.धुळे येथे होणार आहे. या वेळी निमंत्रितांचे कवी संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. या महोत्सवाला साहित्यप्रेमी, कवी, लेखक, कलावंत आणी परिसरातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन माय महोत्सवचे आयोजक प्रवीण नामदेव पवार यांनी केले आहे.

## निधन वार्ता



**दौलताबाद :** श्रीधर अप्पा वामन अप्पा लकडे वय ८८ वर्षे राहणार अब्दीमंडी (माजी सरपंच) यांचे दि १२ ऑक्टोबर रोजी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्यावर अब्दीमंडी वीरशैव समशान भूमी येथेअंत्यविधी करण्यात आलेत्यांच्या पश्चात तीन मुले,एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६


## ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत प्रा. श्रीराम जाधव यांची मराठी विभागास सदिच्छा भेट



**कन्नड :** गांधी विचार व तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत प्रा. श्रीराम जाधव यांनी नुकतीच कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागास सदिच्छा भेट दिली.यावेळी मराठी विभागाच्या वतीने विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे व डॉ. रामचंद्र झाडे यांच्या हस्ते त्यांचा शाल, आणि तिफणचा अंक देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना प्रा. श्रीराम जाधव सर म्हणाले की, गांधीजींचा विचार हा केवळ राजकारणापुरता मर्यादित नाही, तर तो जीवन जगण्याची पद्धत आहे. सत्य, अहिंसा आणि सर्वोदय या तत्वांच्या आधारे आजची मराठी साहित्याची वाटचाल कशी असावी, यावर त्यांनी संवाद साधला. आजच्या तरुणांनी गांधी विचार समजून घेणे काळाची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.आजच्या डिजिटल युगात मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती टिकवण्यासाठी प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभाग, त्रैमासिक तिफण आणि भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद जे कार्य करत आहे, ते अत्यंत मोलाचे असल्याचे गौरवोद्गार त्यांनी या वेळी काढले. यावेळी डॉ. आर. के. पवार, डॉ. जे. व्ही. भेलोंडे, डॉ. प्रकाश महाजन यांची उपस्थिती होती.

# विद्यार्थी विकास हेच महाविद्यालयाचे ध्येय -डॉ. कल्याणकर



**फुलंब्री :** महाविद्यालयातील शिक्षक-पालक संघ विभागाच्या वतीने "शिक्षक-पालक संवाद" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रो. डॉ. पांडुरंग कल्याणकर उपस्थित राहिले. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. प्रस्तुत कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका समितीप्रमुख, प्रो. डॉ. सुरेश मुंढे यांनी मांडली. उपस्थित पालकांनी आपापला परिचय करून दिला.बोलत असताना प्रो. डॉ. पांडुरंग कल्याणकर म्हणाले की, हे महाविद्यालय विद्यार्थी घडविण्यासाठी सुरु झाले आहे. तो ज्ञानी व्हावा त्यातून त्याचा त्याचा विकास व्हावा. विद्यार्थ्यांचा विकास हेच आमचे ध्येय आहे. महाविद्यालयात विविध विभाग कार्यरत असून, त्या त्या विभागांच्या माध्यमातून उत्कृष्ट ज्ञान देण्याचे काम केले जाते. तसेच नेतृत्वगुण विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो. याचा पुरेपूर फायदा विद्यार्थी व पालक यांनी करून घ्यावा. या आपल्या महाविद्यालयातून स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती निघून जाते. तसेच सुसज्ज असे ग्रंथालय व विद्यार्थिनी वसतिगृह पुढील काळात सुरु होईल. तसेच विविध शिष्यवृत्ती यांसारख्या शासनाच्या योजनांचा लाभ आपण सर्वांनी घेतला पाहिजे. आपण याठिकाणी वेगवेगळे अभ्यासक्रम राबवितो. याचाही विद्यार्थ्यांनी फायदा घेतला पाहिजे. असे मत व्यक्त केले. उपस्थित पालकांनी आपापले मतं व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकाला असे वाटते की, आपला मुलगा काहीतरी झाला पाहिजे. त्यासाठी आपण विद्यार्थी काय करतो. तो महाविद्यालयात जातो का? याचा विचार करावा. त्याला महाविद्यालयात पाठवून द्यावे. सामान्य कुटुंबातील विद्यार्थी मोठी होतात मग आपली मुले शिकून का? यशस्वी होत नाहीत याचाही विचार आपण केला पाहिजे. आपल्या पुढे निर्माण झालेल्या समस्यांवर आपणच तोडगा काढला पाहिजे. असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेश थोरात यांनी केले. तर उपस्थित मान्यवर व पालक यांचे आभार प्रो. डॉ. राजश्री पवार यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आज क्रांती चौकात तीव्र निदर्शने

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी तसेच एसआयआर (SIR) प्रक्रियेत कथितरीत्या करण्यात आलेल्या बेकायदेशीर बदलांच्या निषेधार्थ आज, मंगळवारी (दि. १३ ऑक्टोबर) सायंकाळी ४ वाजता शहरातील क्रांती चौक येथे तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत. या निदर्शनांना पोलिसांनी परवानगी दिली आहे. निवडणूक प्रक्रियेत वारंवार गैरप्रकार होत असल्याचा आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कथित दुहेरी आणि एकतर्फी भूमिकेविरोधात जनसामान्यांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. एसआयआर प्रक्रियेतील कथित बेकायदेशीर बदल आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, ही आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी क्रांती चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या निदर्शनांमध्ये नागरिक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक ॲड. अभय टाकसाळ, प्राचार्य सुनील वाकेकर, प्रा. देवानंद वानखेडे, दिक्षा पवार, डॉ. लोकेश कांबळे, ॲड. दत्ता हूड, प्रा. गुणरत्न सोनवणे, अक्रम खान, अमरदिप हिवराळे, प्रा. अविनाश सावंत मनीषा बल्लाळ, अरुण मते रोहिणी नवले, पल्लवी बोराळकर, शीतल चोपडे आणि मोहित जाधव यांनी केले आहे.

# वेरूळ लेणी हे भारतीय शिल्प-स्थापत्य कलेचे महाकाव्य



**छत्रपती संभाजीनगर:** भारतीय कला व स्थापत्य मध्ये अनेक वेगवेगळे रूप आपल्याला दिसून येतात. त्या धर्मात वेगवेगळे कला गुण आढळून येतात. बौद्ध हिंदू जैन शिल्प व स्थापत्य कलेमध्ये वेगळेपण व समानता आपल्याला नेहमीच दिसून येते. याचाच परिपाक म्हणजे वेरूळ लेणी होय. म्हणूनच वेरूळ लेणी हे भारतीय शिल्प- स्थापत्य कलेचे महाकाव्य आहे असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत गणवीर यांनी केले.'रीडिंग एलोरा' कला, वास्तुकला, प्रतिमाशास्त्र आणि पवित्र भूदृश्य या विषयांवरील तीन दिवशीय आंतरविद्याशाखीय क्षेत्रीय कार्यशाळा वारसा फाउंडेशन, पुणे व भारतीय पुरातत्व सर्वेक्षण छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने ९ ते ११ ऑक्टोबर २०२६ रोजी वेरूळ येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते पुढे म्हणाले की,वेरूळ हे अद्भुत आहे.परकिय प्रवास वर्णन,मराठी साहित्यात वेरूळचा उल्लेख आलेला आहे.त्यामध्ये लीळाचरित्र ज्ञानेश्वरी,स्थानपोथी,वेरूळ महात्म्य, कथाकल्पतरूमध्ये मोठ्या प्रमाणात दखल घेण्यात आली आहे.कैलास लेणीची निर्मिती ही कोकस या पैठणच्या स्थापथीने केली आहे.असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत गणवीर यानी केले.सदरील कार्यशाळेचे उद्घाटन भारतीय पुरातत्व खात्याचे अधिक्षक डा अरूण मलिक यानी केले.त्यानी कार्यशाळेतील सर्व सहभागीचे स्वागत करून पुढील तीन दिवस वेरूळ लेणीची सानिध्यात राहुन त्याचे रसग्रहण करावे असे प्रतिपादन केले दूपारच्या सत्रात गुरुवेंद्र कुशवाहा यांनी हिदु धर्म आणि वेरूळचा सहसंबंधाचा याचा उलगडा केला.पशुपाथ पथ,लकुशीलच्या विविध मूर्तीचे वर्णन केले. तिसऱ्या सत्रामध्येओशिन बंब यांनी जैन लेणी या विषय सविस्तर माहिती सागितली. लेणी 30 ते 34 मधील वास्तुशास्त्र, मूर्तीशास्त्र व चित्रकले विषयी माहिती दिली. या कार्यशाळेत विविध राज्यातुन 30 सहभागीनी सहभाग नोंदवला आहे.या कार्यशाळेचे आयोजन वारसा फाउंडेशनची धनंजय खंदारे यांनी आयोजित केले. यावेळी ऑलिव्हर फिलिप फ्रे स्वित्झर्लंड, इतिहास व पुरातत्त्व अभ्यासक डॉ संजय पाईकराव,माजी प्रशासकीय सनदी अधिकारी आयपीएस किरण जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी नूपुर परब, अहाना हाती, अमेय किजवडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले


MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM
MAHARASHTRA JANSHAKTI
MJ NEWS

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६


## भाव कवयित्री - शांता शेळके



मराठी साहित्यातील भावकवयित्री शांता शेळके यांचा जन्म - १२ ऑक्टोबर १९२२ रोजी इंदापूर, जिल्हा-पुणे येथे झाला.चौफेर काव्यलेखनाने रसिकांना आनंद देणाऱ्या कवयित्री शांता शेळके यांचा जन्म इंदापूरला, तर बालपण खेड मंचरच्या परिसरात गेले. पुण्याच्या हुजूरपागा शाळेतून शालेय शिक्षण घेतल्यानंतर पुण्यातच सर परशुरामभाऊ महाविद्यालयात शांता शेळके यांनी पुढील शिक्षण घेतले. संस्कृत आणि मराठी भाषेतून एम. ए.करताना त्या मुंबई विद्यापीठात पहिल्या आल्या. त्यावेळी त्यांना न.चि. केळकर आणि चिपळूणकर पुरस्कार मिळाले होते. त्यानंतर मुंबई येथे अल्पकाळ आचार्य अत्रे यांच्या नवयुग साप्ताहिकात नोकरी केली. पुढे नागपूर आणि मुंबई येथील महाविद्यालयांतून मराठीचे अध्यापन केले. मराठी, संस्कृत आणि इंग्रजी या तिन्ही भाषांवर शांताबाईचं प्रभुत्व होतं. कथा कादंबऱ्या, स्तंभलेखन लिहिणाऱ्या, भाषांतर व अनुवाद करणाऱ्या शांताबाई कवयित्री म्हणून अधिक लोकप्रिय झाल्या आणि मराठी माणसांच्या मनापर्यंत पोहोचल्या. एखाद्या गीतातून भावनाट्य चित्रीत करण्याचं शब्दकौशल्य त्यांच्या अनेक गीतांतून होते. विविध क्षणातील वेगवेगळे तरंग त्यांच्या तरलतेसह टिपणं त्यांना सहज जमायचं. गाण्यातलं मराठीपण त्यातल्या सुगंधासह जपण्यासाठी अस्सल ग्रामीण शब्द गाण्यात घालताना त्यांची प्रतिभा कचरली नाही. सखे, सये अशा संबोधनातून ते घरच वाहू लागतय. उनाड मनाच्या अवखळ प्रियकराचा अल्लडपणा, त्याचं प्रेयसीला चिडवणं हे सगळं त्या मोठ्या मिश्कीलपणे कवितेत व्यक्त करत. त्यांनी अनेक गीतांतून स्त्रीमनाच्या छटा त्यातील स्वाभाविकतेसह व्यक्त केलेल्या आहेत. प्रियकराच्या मनातील विरह, प्रीती, धैर्य, बेछूटपणा यांचाही प्रत्यय देणारी त्यांची अनेक गाणी आहेत. कोणत्या तरी दाहक वेदनेचा चटका बसून संपूर्ण आयुष्यालाच एक रिक्तता यावी, अशी त्यांची गाणी आजही लोकप्रिय आहेत. शांताबाईची भाषाशैली आणि काव्यशैली पहिल्या पासूनच ओघवती, लालित्यपूर्ण; पण त्याचं सगळं श्रेय त्या आचार्य अत्रे यांना देत. 'नवयुग' मध्ये नोकरी करत असताना प्र.के. अत्रे एकदा त्यांना म्हणाले होते, 'शांता, तुला शब्दांचा सोस फार आहे. लहान मुलं ज्याप्रमाणं रंगीबेरंगी खडे गोळा करतात त्याप्रमाणं तू शब्द गोळा करतेस. बोलण्यातला ओघ आपल्या लेखनात आला पाहिजे.' अत्र्यांचं हे वाक्य त्यांनी लक्षात ठेवलं आणि आपली संस्कृतप्र चुर भाषाशैली बदलली.कविता, कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, बालसाहित्य, चित्रपटगीते, समीक्षा, आत्मकथन, अनुवाद अशा विविध साहित्य प्रकारात लेखन शांता शेळके केलेल्या वृतपत्र, संपादक तथापि कवयित्री आणि गीतकार म्हणून आजच्या पिढीतही विशेष प्रसिद्ध आहेत. बालसाहित्याच्या जगातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. अनेक नाटके, ध्वनी मुद्रिका, चित्रपटांसाठी त्यांनी विपुल गीतलेखन केले. तोच चंद्रमा, कळ्यांचे दिवस फुलांच्या राती, चित्रगीते ही त्यांची गीतसंकलने प्रसिद्ध आहेत. शांताबाईंनी हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांमधील साहित्याचे अत्यंत ओघवत्या शैलीत मराठी भाषांतर केलेले आहे. महाकवी कालिदासाचे मेघदूत, चौघीजणी त्यांच्या कवितांबरोबरच त्यांचे गद्यलेखन सुद्धा खूप सुंदर आणि मनाला पकडून ठेवणारे आहे. वाचायला घेतले की सोडवत नाही त्यांची पुस्तके. त्यांचे गुलमोहोर, कावेरी, बासरी, इत्यादी कथासंग्रह तर ओढ, धर्म, अशा कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. धूळपाटी नावाचे त्यांचे आत्मचरित्र सुद्धा खूप सुंदर आहे. स्वतःच्या लहानपणाबद्दलच्या त्यातील आठवणी तर आपल्याला हेवा करायला लावतात. तसेच पावसा आधीचा पाऊस, आनंदाचे झाड, वडीलधारी माणसे हे त्यांचे ललित लेख संग्रह खूपच गाजलेले आहेत. भाषांतर हे शांताबाईंच्या दृष्टीनी फक्त अर्थाजनाचे साधन नव्हते तर स्वतःच्या भाषाभ्यासातील भर टाकणारेपण होते. त्यातील अत्यंत गाजलेले भाषांतर म्हणजे जपानी हायकुंचे. जपान मधील हा काव्यप्रकार त्यांनी अनुवादित करून मराठी रसिकांच्या पुढे 'पाण्यावरच्या पाकळ्या' नावानी ठेवला आणि तो लोकांना इतका आपला वाटला की लोक आता मराठी हायकू असंच म्हणतात. जरी अनेक साहित्य प्रकार समर्थपणे हाताळले असले तरी, कविता लेखन हा शांताबाईंच्या विशेष आवडीचा साहित्य प्रकार. असेन मी नसेन मी, वर्षे, रूपसी, गोंदण, अनोळख, जन्माजान्हवी ही त्यांच्या कविता संग्रहांची काही नावे. 'मुक्ता आणि इतर गोष्टी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'स्वप्नतरंग' ही त्यांची पहिली कादंबरी; तर 'शब्दांच्या दुनियेत' हा त्यांचा पहिला ललितलेखसंग्रह. त्यांनी उत्तम अनुवादही केले. 'मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश' सारखी भक्ती गीते लिहिली. 'शूर आम्ही सरदार' आणि 'मराठी पाऊल पडते पुढे' या सारख्या चित्रपट गाण्यांनी अनेकांना स्फुरण दिलंय. शांता शेळके म्हणजे सगळ्या लहान मुलांच्या लाडक्या आजी. नातवंडांसाठी 'किलबिल किलबिल पक्षी बोलती', विहीणबाई विहीणबाई' अश्या अनेक छान छान कविता, बालगीतं लिहिणाऱ्या. शांता शेळकेंनी साधेपणा आयुष्यभर जपला. निसर्गा विषयी मात्र त्यांना विलक्षण ओढ होती. निसर्गाच्या सांनिध्यात त्या तहानभूक विसरून तासनतास बसत. निसर्ग हाच त्यांचा खरा सखा सोबती होता. निसर्गाच्या अनेक छटा त्यांनी त्यांच्या गीतांतून व्यक्त केल्यात. शांता शेळके यांनी अनेक वर्षे नाटक आणि चित्रपटांच्या सेन्सॉर बोर्डावर काम केले. आळंदी इथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांना मिळाला होता.


**प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे**
**जे ई एस महाविद्यालय**
**जालना. भ्रमणध्वनी-**
**९४२१३१९२७०**


## शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे कथाकार दत्ता मोरसकर यांचा सत्कार



**कन्नड :** कन्नड तालुक्यातील रामनगर येथील शेतकरी कवी, कथाकार व पत्रकार दत्ता मोरसकर यांच्या 'कल्पनेच्या पलिकडे' या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे प्रतिष्ठेचे नवलेखक अनुदान जाहीर झाल्याबद्दल शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे आज त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.मराठी विभाग व शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित या सत्कार समारंभात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते दत्ता मोरसकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, मराठी विभाग प्रमुख व तिफणकार डॉ. शिवाजी हुसे, प्रा. डॉ. रामचंद्र झाडे, ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.प्राचार्य डॉ. भोसले म्हणाले...यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले, "दत्ता मोरसकर यांच्यासारखा शेतकरी पुत्र जेव्हा साहित्याच्या प्रांतात येतो, तेव्हा ते साहित्य अधिक जिवंत आणि अस्सल असते. शेतीतील कष्ट, निसर्गाशी असलेले नाते आणि ग्रामीण जीवनातील संघर्ष त्यांनी 'कल्पनेच्या पलिकडे' या कथासंग्रहात अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. शासनाचे अनुदान मिळणे ही केवळ त्यांची वैयक्तिक उपलब्धी नसून ती संपूर्ण कन्नड तालुक्यासाठी आणि शिवाजी महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. तिफण साहित्य मंचाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील साहित्यिकांना व्यासपीठ मिळत आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. दत्ता मोरसकर यांनी भविष्यातही असेच उत्तम लेखन करून मराठी साहित्यात आपला ठसा उमटवावा."दत्ता मोरसकर हे तिफण साहित्य परिवारातील महत्त्वाचे सदस्य असून गेली अनेक वर्षे ते शेती, ग्रामीण जीवन आणि शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदना आपल्या कविता व कथांमधून मांडत आहेत. सत्काराला उत्तर देताना दत्ता मोरसकर यांनी साहित्य आणि संस्कृती मंडळाचे, शिवाजी महाविद्यालयाचे आणि तिफण परिवारातील सर्व साहित्यिक मित्रांचे आभार मानले.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६

# धम्मचक्र प्रवर्तन : मानवी प्रतिष्ठेच्या परिवर्तनाची ऐतिहासिक पहाट- डॉ. राजेंद्र बगाटे

दि. १४ ऑक्टोबर हा दिवस भारतीय समाजाच्या इतिहासातील सामाजिक जागृती, स्वाभिमान आणि समतेच्या नव्या पर्वाचे स्मरण करून देतो. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना धम्मदीक्षा दिली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी हा दिवस 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ धर्मांतराच्या घटनेपुरते मर्यादित नाही. तो अन्यायकारक सामाजिक रचनेला नकार देऊन मानवी प्रतिष्ठा, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि विवेकनिष्ठ जीवनाचा स्वीकार करण्याचा संकल्प आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मदीक्षेच्या माध्यमातून समाजाला नवी वैचारिक दिशा दिली. माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर किंवा जातीवर ठरत नसून त्याच्या मानवी अस्तित्वावर ठरले पाहिजे, हा विचार या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी होता. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भूतकाळातील एका महत्त्वपूर्ण घटनेचा स्मृतिदिन असण्याबरोबरच वर्तमानातील सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.भारतीय समाजात जातिभेद आणि अस्पृश्यतेमुळे अनेक पिढ्यांना सामाजिक अन्यायाचा सामना करावा लागला. जन्माच्या आधारावर व्यक्तीचे स्थान ठरविणाऱ्या व्यवस्थेमुळे काही समूहांना शिक्षण, सार्वजनिक पाणवठे, धार्मिक स्थळे आणि प्रतिष्ठेच्या संधींपासून दूर ठेवण्यात आले. व्यक्तीचे ज्ञान, कर्तृत्व आणि नैतिकता यांपेक्षा तिची जात महत्त्वाची मानली गेली. परिणामी, सामाजिक विषमता केवळ आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित राहिली नाही, तर ती मानवी संबंधांमध्ये आणि व्यक्तीच्या आत्मभानातही रुजली. अशा परिस्थितीत समानतेचा आग्रह धरणे म्हणजे प्रस्थापित सामाजिक समजुतींना आव्हान देणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या व्यवस्थेचे स्वरूप स्वतः अनुभवले आणि तिच्या कारणांचा सखोल अभ्यास केला. त्यांनी अन्यायाला नशिबाचा भाग मानण्याऐवजी त्याविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या कार्यामुळे वंचित समूहांमध्ये आपल्या अधिकारांविषयी जागरूकता निर्माण झाली आणि सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा पाया शिक्षण, संघटन आणि संघर्ष या तत्त्वांवर उभा होता. प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण प्राप्त करून त्यांनी अर्थशास्त्र, कायदा, राज्यव्यवस्था आणि समाजरचना यांचा अभ्यास केला. त्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग वैयक्तिक प्रगतीपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक परिवर्तनासाठी केला. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहातून सार्वजनिक पाण्यावर समान हक्काचा प्रश्न उपस्थित झाला. नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनाने धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील भेदभावाला आव्हान दिले. या आंदोलनांचे महत्त्व केवळ एखाद्या ठिकाणी प्रवेश मिळविण्यात नव्हते, तर समान नागरिकत्व आणि मानवी प्रतिष्ठेचा अधिकार अधोरेखित करण्यात होते. समाजातील सार्वजनिक साधनसंपत्ती, शिक्षण आणि संधी यांवर सर्वांचा समान हक्क असला पाहिजे, हा विचार या संघर्षांतून व्यक्त झाला. सामाजिक न्यायासाठी केवळ सहानुभूती पुरेशी नसते; अधिकारांची मान्यता आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आवश्यक असते, हे डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीने दाखवून दिले.सामाजिक परिवर्तनासाठी बाह्य परिस्थितीत बदल घडविण्याबरोबरच व्यक्तीच्या विचारविश्वातही परिवर्तन घडले पाहिजे, अशी डॉ. आंबेडकर यांची भूमिका होती. जातीय विषमता टिकवून ठेवणाऱ्या रूढी, पूर्वग्रह आणि अंधानुकरणाचा चिकित्सक विचार केल्याशिवाय समाजाला मुक्ती मिळू शकत नाही. व्यक्तीने स्वतःच्या परिस्थितीचे आकलन करावे, अन्याय ओळखावा आणि त्याविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य विकसित करावे, हा त्यांच्या विचारांचा महत्त्वाचा भाग होता. स्वाभिमान म्हणजे दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची भावना नव्हे, तर स्वतःला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे याची जाणीव आणि इतरांच्या प्रतिष्ठेचा आदर होय. अशा स्वाभिमानातून व्यक्तीमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि सामाजिक जीवनातील सहभाग वाढतो. समतेचा विचार स्वीकारणारा समाज कोणत्याही व्यक्तीला तिच्या जन्माच्या आधारावर कमी लेखत नाही. म्हणूनच सामाजिक न्यायाची सुरुवात प्रत्येक व्यक्तीला समान मानवी प्रतिष्ठा देण्यापासून होते.१९३५ मध्ये येवला जि. नाशिक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराचा निर्धार जाहीर केला. हा निर्णय त्यांच्या दीर्घ वैचारिक चिंतनाचा आणि सामाजिक अनुभवांचा परिणाम होता. धर्माचा मानवी जीवनावर, सामाजिक संबंधांवर आणि नैतिक मूल्यांवर होणारा परिणाम त्यांनी तपासला. त्यांनी विविध धार्मिक परंपरा आणि तत्त्वज्ञानांचा अभ्यास केला. त्यांच्या दृष्टीने धर्माने माणसाला विवेकशील जीवनाची प्रेरणा द्यावी, नैतिक आचरणाला महत्त्व द्यावे आणि मानवी प्रतिष्ठेच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करावे. गौतम बुद्धांच्या धम्मात त्यांना प्रज्ञा, करुणा, समता आणि नैतिकतेचा समन्वय आढळला. त्यामुळे बौद्ध धम्माचा स्वीकार हा केवळ धार्मिक ओळख बदलण्याचा निर्णय नव्हता, तर अन्यायकारक सामाजिक संकेतांना नकार देऊन मानवी मूल्यांवर आधारित जीवनाचा स्वीकार होता. या निर्णयामागे आत्मसन्मान, सामाजिक मुक्ती आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीची व्यापक आकांक्षा होती.दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भदंत चंद्रमणी महास्थविर यांच्याकडून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि त्यानंतर आपल्या अनुयायांना धम्मदीक्षा दिली. ही घटना भारतीय सामाजिक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. लाखो लोकांच्या सहभागातून व्यक्त झालेल्या या परिवर्तनाने स्वाभिमान आणि नव्या सामाजिक ओळखीचा संदेश दिला. दीक्षाभूमी हे आज समता, सामाजिक जागृती आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रतीक बनले आहे. धम्मदीक्षेमुळे अनेकांना आपल्या जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळाली. आपणही समाजाचे समान सदस्य आहोत, आपल्याला शिक्षण आणि प्रगतीचा अधिकार आहे आणि समाजाच्या परिवर्तनात आपली भूमिका महत्त्वाची आहे, अशी जाणीव दृढ झाली. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा ऐतिहासिक आशय याच सामूहिक आत्मभानात सामावलेला आहे. या दिवसातून मिळणारी प्रेरणा आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी या घटनेचा सामाजिक आणि वैचारिक अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.धम्मदीक्षेच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेल्या बावीस प्रतिज्ञांना या परिवर्तनात विशेष महत्त्व आहे. या प्रतिज्ञांमधून अंधानुकरणाला नकार, विषमता टिकविणाऱ्या प्रथांपासून दूर जाण्याचा निर्धार आणि बुद्धांच्या धम्मातील नैतिक मूल्यांचा स्वीकार व्यक्त होतो. प्रतिज्ञा उच्चारणे हा परिवर्तनाचा आरंभ असू शकतो; मात्र त्या प्रतिज्ञांनुसार जगणे ही त्यांची खरी कसोटी आहे. जातीय श्रेष्ठत्वाची भावना टाळणे, अन्यायाला पाठिंबा न देणे, विवेकाच्या आधारे निर्णय घेणे आणि सर्व व्यक्तींशी सन्मानाने वागणे या मूल्यांचा व्यवहारात स्वीकार करणे आवश्यक आहे. धम्माचा स्वीकार केल्यानंतर सामाजिक प्रश्न आपोआप सुटतात असे नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी आवश्यक असते. प्रतिज्ञा व्यक्तीला आपल्या विचारांचे आणि वर्तनाचे परीक्षण करण्याची संधी देतात. आपल्या कृतींमुळे इतरांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचत नाही ना, आपण भेदभावाला नकळत प्रोत्साहन देत नाही ना, असे प्रश्न स्वतःला विचारणे हीदेखील परिवर्तनाची महत्त्वाची प्रक्रिया आहे.गौतम बुद्धांच्या धम्मात प्रज्ञा, करुणा आणि शील या मूल्यांना मध्यवर्ती स्थान आहे. प्रज्ञा म्हणजे विवेकपूर्ण विचारातून सत्याचा शोध घेणे. करुणा म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी संवेदनशीलतेने प्रयत्न करणे. शील म्हणजे नैतिक आचरण आणि आपल्या कृतींबद्दल जबाबदारीची जाणीव ठेवणे. ही मूल्ये व्यक्तीला स्वतःच्या हितापुरता विचार करण्यापासून दूर नेतात आणि समाजाच्या व्यापक कल्याणाकडे पाहण्याची दृष्टी देतात. दुसऱ्याच्या अडचणींकडे दुर्लक्ष न करणे, मतभेद असतानाही संवाद साधणे, द्वेषाऐवजी संयमाचा मार्ग स्वीकारणे आणि अन्याय होताना मौन न बाळगणे ही या मूल्यांची व्यावहारिक रूपे आहेत. आजच्या स्पर्धात्मक जीवनात संपत्ती, पद आणि प्रतिष्ठा यांना मोठे महत्त्व दिले जाते. अशा परिस्थितीत प्रज्ञा आणि करुणेचा समन्वय व्यक्तीला अधिक संवेदनशील बनवू शकतो. माणसाच्या यशाचे मोजमाप केवळ त्याच्या वैयक्तिक संपत्तीवर न करता समाजासाठी त्याने केलेल्या योगदानावरही केले पाहिजे, अशी जाणीव या मूल्यांमधून निर्माण होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा भारतीय संविधानाशीही घनिष्ठ संबंध आहे. संविधानाने सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार दिला असून अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याची तरतूद केली आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाही जीवनाची मूलभूत मूल्ये आहेत. मात्र, कायद्याने समानता मान्य केली म्हणून समाजातील सर्व प्रकारचे भेदभाव आपोआप संपत नाहीत. जातीय पूर्वग्रह, सामाजिक बहिष्कार, आर्थिक शोषण आणि महिलांना दुय्यम स्थान देणाऱ्या प्रवृत्ती आजही विविध स्वरूपांत आढळतात. म्हणून संविधानाचा सन्मान करणे म्हणजे केवळ त्यातील तरतुदींची माहिती ठेवणे नव्हे, तर त्यातील मूल्ये प्रत्यक्ष जीवनात उतरविणे होय. सार्वजनिक ठिकाणी समानतेने वागणे, इतरांच्या अधिकारांचा आदर करणे, अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने आवाज उठविणे आणि सामाजिक सलोखा टिकविणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. लोकशाहीची मजबुती केवळ शासनसंस्थांवर अवलंबून नसते; ती नागरिकांच्या वर्तनात आणि परस्पर संबंधांमध्येही प्रतिबिंबित झाली पाहिजे.शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला स्वाभिमान, स्वावलंबन आणि सामाजिक प्रगतीशी जोडले. शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतःच्या हक्कांची जाणीव होते, प्रश्न विचारण्याची क्षमता विकसित होते आणि रूढ समजुतींची चिकित्सा करता येते. शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळविणे किंवा रोजगार प्राप्त करणे एवढाच नसावा. वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिकता, सामाजिक संवेदनशीलता आणि लोकशाही मूल्ये विकसित करणे हेही शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक स्थितीच्या आधारावर भेदभाव होणार नाही, असे वातावरण निर्माण केले पाहिजे. वंचित विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, डिजिटल साधने आणि प्रगतीच्या समान संधी मिळणे आवश्यक आहे. ज्ञानामुळे व्यक्ती सक्षम होते; परंतु ज्ञानाबरोबर सामाजिक जबाबदारी विकसित झाली, तर शिक्षण समाजाच्या व्यापक कल्याणासाठी अधिक प्रभावी ठरते.समताधिष्ठित समाजनिर्मितीत स्त्री-पुरुष समानतेलाही महत्त्वाचे स्थान आहे. महिलांना शिक्षण, रोजगार, सुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसा, हुंडा, बालविवाह, रोजगारातील भेदभाव आणि महिलांच्या मतांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती या समाजातील असमानतेच्या समस्या आहेत. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेद न करणे, घरातील जबाबदाऱ्या समानतेने वाटून घेणे, महिलांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे आणि सार्वजनिक जीवनातील त्यांचा सहभाग वाढविणे ही प्रत्यक्ष परिवर्तनाची पावले आहेत. समतेचा स्वीकार करणारा समाज महिलांच्या अधिकारांकडे दुय्यम प्रश्न म्हणून पाहू शकत नाही. महिलांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगता येणे, त्यांच्या क्षमतांना वाव मिळणे आणि त्यांना स्वतःच्या आयुष्याविषयी निर्णय घेता येणे हे न्याय्य समाजाचे महत्त्वाचे लक्षण आहे. करुणा आणि समता ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवायची असतील, तर महिलांविषयीच्या सामाजिक दृष्टिकोनातही बदल घडवावा लागेल.आजच्या तंत्रज्ञानप्रधान काळात विवेकनिष्ठ विचारांची गरज अधिक वाढली आहे. सामाजिक माध्यमांवर माहितीचा वेग प्रचंड असला, तरी प्रत्येक माहिती सत्य असेलच असे नाही. अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणारे दावे समाजात गैरसमज निर्माण करू शकतात. अशा वेळी माहितीची सत्यता तपासणे, पुराव्यांच्या आधारे विचार करणे आणि मतभिन्नतेचा आदर राखणे आवश्यक आहे. दुसऱ्या व्यक्तीच्या श्रद्धेशी किंवा विचारांशी असहमती असली, तरी तिचा अपमान करणे योग्य नाही. संवाद आणि विवेकाच्या आधारे मतभेद सोडविण्याची संस्कृती लोकशाहीला बळकटी देते. बुद्धांचा विवेकनिष्ठ दृष्टिकोन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्यायाचा आग्रह स्वीकारल्यास समाजात जबाबदार चर्चा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सहिष्णुता वाढू शकते. तंत्रज्ञानाचा वापर ज्ञानाचा प्रसार, शैक्षणिक मदत आणि सामाजिक जागृतीसाठी केला, तर तो अधिक समताधिष्ठित समाजनिर्मितीचे साधन ठरू शकतो.धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करताना दीक्षाभूमीवरील कार्यक्रम, धम्मवंदना, व्याख्याने आणि सांस्कृतिक उपक्रमांना महत्त्व आहे. या कार्यक्रमांमुळे इतिहासाचे स्मरण होते आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळते. मात्र, या दिवसाचे महत्त्व केवळ सोहळ्यांपुरते मर्यादित ठेवता कामा नये. वाचनसंस्कृती वाढविणे, आरोग्यविषयक जनजागृती करणे, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्न करणे आणि जातीय भेदभावाविरुद्ध संवाद घडविणे अशा उपक्रमांमधून धम्माचा सामाजिक आशय अधिक प्रभावीपणे व्यक्त होऊ शकतो. तरुणांनी बुद्धांच्या विचारांचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनाचा अभ्यास करून त्यांचा संबंध आजच्या सामाजिक प्रश्नांशी जोडला पाहिजे. इतिहासातील महान व्यक्तींचा गौरव करणे आवश्यक असले, तरी त्यांच्या विचारांनुसार वर्तमानातील समस्यांवर काम करणे अधिक महत्त्वाचे आहे. सामाजिक बांधिलकीतून उभे राहणारे उपक्रम धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या संदेशाला दैनंदिन जीवनाशी जोडतात.धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा खरा संदेश समता, स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत आहे. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी कायदे, शिक्षण, सामाजिक चळवळी आणि वैयक्तिक आचरण यांची सांगड घालणे आवश्यक आहे. समता ही घोषणेत नव्हे, तर व्यवहारात दिसली पाहिजे; बंधुता भाषणापुरती न राहता परस्परांच्या दुःखाची जाणीव ठेवणाऱ्या कृतींतून व्यक्त झाली पाहिजे; आणि विवेक हा केवळ चर्चेचा विषय न राहता निर्णयांचा आधार बनला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता येईल, प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळेल, महिलांना समान अधिकार मिळतील आणि जात-धर्माच्या भिंतींपलीकडे मानवी नात्यांची उभारणी होईल, असा समाज निर्माण करणे हीच या दिवसाची खरी प्रेरणा आहे. १४ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे स्मरण करताना आपण स्वतःच्या विचारांचे आणि वर्तनाचे परीक्षण करून प्रज्ञा, करुणा, समता आणि बंधुता या मूल्यांनुसार जगण्याचा संकल्प करूया. कारण धम्मचक्र प्रवर्तनाचा खरा अर्थ इतिहासातील परिवर्तनाचा गौरव करण्यातच नाही, तर त्या परिवर्तनाला आपल्या जीवनातून आणि सामाजिक कृतीतून पुढे नेण्यात आहे. या मूल्यांचा सातत्याने स्वीकार केला, तर अधिक न्याय्य, संवेदनशील आणि मानवी समाजाच्या निर्मितीचा मार्ग अधिक दृढ होईल.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र, पाली व बौद्ध साहित्याचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल —**
**bagate.rajendra5@gmail.com**